|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

'A'Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**राष्ट्रीय सेवा योजाना विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/१४-क/रासेयो-०८/रेरिबन./२१४ /२०१९ दि.२५/११/२०१९

**ई-पत्र**

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
जळगाव शहरातील रा.से.यो. एकक असलेले महाविद्यालये व
विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा विभाग यांना

**विषय :- दि. ०१ डिसेंबर, २०१९ रोजी जागतीक एड्स दिना निमित्त प्रभातफेरी सहभागा संदर्भात..**
**संदर्भ :-** पत्र क्र. सारुज/डापकु/जाएड्सदिन/७७३-७६/२०१८ ,दि. २० नोव्हेंबर,२०१९

महोदय,

मा.जिल्हा शल्य चिकीत्सक तथा सचिव, जिल्हा एड्स प्रतिबंधक नियंत्रण विभाग, सामान्य रुग्णालय, जळगाव यांचे संदर्भिय पत्र मा.कुलगुरु महोदयांच्या नावे प्राप्त झाले असून सदर पत्रात त्यांनी नमूद केले आहे की,जागतीक एड्स दिन २०१९ निमित्त या वर्षाचे घोषवाक्य **Know Your Status** असे असून जागतीक एड्स दिनाचे औचित्य साधून एचआयव्ही संसर्गितांसाठी सेवा सुविधा व सकारात्मक जीवनशैली, एचआयव्हीमुळे देशाच्या विकासावर होणारा परिणाम तसेच एचआयव्ही संदर्भात युवावर्गाची भूमिका,जबाबदारी व औषधोपचार अशा अनेक गहन मुदयांबाबतची माहिती प्रभातफेरी मार्फत जास्तीत जास्त युवावर्गापर्यंत तसेच सामान्य जनतेपर्यंत पोहचण्याच्या उद्देश्याने दि.०१ डिसेंबर २०१९ रोजी सकाळी ८.०० वाजता प्रभात फेरीचे आयोजन जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या आवारात करण्यात आलेले आहे.या प्रभातफेरी करिता मा.कुलगुरु, मा.जिल्हाधिकारी , मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर विभागातील मुख्य अधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते व इतर मान्यवर उपस्थित राहणार असून युवा वर्गामध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने जास्तीत जास्त विद्यार्थी व विद्यार्थीनींना उपस्थित रहाणे.विषयी सुचित करावे असे कळविले आहे.

तरी या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,**दिनांक ०१ डिसेंबर, २०१९ रोजी सकाळी ८.०० वाजता** जिल्हा सामान्य रुग्णालय येथून सुरु होणाऱ्या प्रभात फेरीसाठी आपण, आपल्या रासेयो एककाचे पदाधिकारी व विद्यार्थी स्वयंसेवक यांनी सदर दिवशी सकाळी ७.३० वा. जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगाव येथे उपस्थित रहाण्याविषयी नियोजन करावे व संबधितांना प्रेरित करावे. आपल्या सहकार्याने सदर उपक्रम यशस्वी होईल ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

( डॉ.पंकजकुमार शां.नन्नवरे )
**संचालक, रासेयो**

**प्रत :-**

१) विभाग प्रमुख, कुलगुरु कार्यालय,२)विभाग प्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय,३)विभाग प्रमुख, कुलसचिव कार्यालय,४)मा.जिल्हा शल्य चिकित्सक तथा सचिव, जिल्हा एड्स प्रतिबंधक नियंत्रण विभाग, सामान्य रुग्णालय, जळगाव

# महाराष्ट्र शासन

MSACS

## जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव.

DAPCU

भ्रमणध्वनी : ८६२३०६७८४६, ९४०४७७९७००, कार्यालय : ०२५७ - २२३३०९१, फॅक्स : ०२५७ - २२३२३९०

Email ID – dsjalgaon@mahasacs.org, dpojalgaon@mahasacs.org


आरोग्य सेवा

जा.क्र.सारुज/डापकु/जाएड्सदिन/२०१९-२०/७७३-७६

दि. 20 NOV 2019

प्रती,
मा.कुलगुरु सो.,
कवियत्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विदयापीठ, जळगाव.

**विषय** :- जागतिक एड्स दिन - २०१९ निमित्त प्रभातफेरीबाबत....

**संदर्भ** : १.मा.उपसंचालक (आयईसी), महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई यांचे पत्र क्र.मराएनिसं/आयईसी /जाएदि/२०१९-२०/६०२५-०५८ दि. ०६/११/२०१९

२. मा.जिल्हा शल्य चिकित्सक, जळगाव यांची दि.०८/११/२०१९ रोजीची मंजूर टिपणी

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये **जागतिक एड्स दिन २०१९ निमित्त या वर्षीचे घोषवाक्य** ***Know Your Status*** असे असून **जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून** एचआयव्ही संसर्गितांसाठी सेवा सुविधा व सकारात्मक जीवनशैली, एचआयव्हीमुळे देशाच्या विकासावर होणारा परिणाम तसेच एचआयव्ही संदर्भात युवावर्गाची भूमिका व जबाबदारी व औषधोपचार अशा अनेक गहन मुददयांबाबतची माहिती महाविदयालयीन युवकांना विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून पोस्टर प्रदर्शन, पथनाटय, व्याख्याने, प्रभातफेरी मार्फत जास्तीत जास्त युवावर्गापर्यत तसेच सामान्य जनतेपर्यंत पोहचवण्याच्या उददेशाने **दि.०१ डिसेंबर २०१९ रोजी सकाळी ८:०० वाजता प्रभातफेरीचे आयोजन जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आवारत करण्यात आलेले आहे.**

या प्रभातफेरीसाठी मा.कुलगुरु, कबचौ उमवि, जळगाव, मा.जिल्हाधिकारी, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.पोलिस निरिक्षक व इतर विभागातील सर्व मुख्य अधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहे.

युवा वर्गामध्ये जनजागृती करण्याच्या उददेशाने जळगाव जिल्हयातील एनएसएस विभागांतर्गत रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर क्लबकरिता प्रति महाविदयालय चालु आर्थिक वर्षात (सन २०१९-२०) **प्रत्येकी ४०००/- रु ऐवढे अनुदान प्रत्येक महाविदयालयाच्या रेड रिबन क्लबच्या बॅंकखातेवर जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण विभाग, सामान्य रुग्णालय, जळगाव यांचे मार्फत वर्ग** करण्यात आलेले आहे. सदरील अनुदानमधुन महाविदयालायात एड्स विषयक जनजागृतीपर विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे याबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना या कार्यालयाकडून संबधित महाविदयालयास निर्गमित करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे जिल्हा / तालुका स्तरावर आयोजित करण्यात येणा-या जनजागृतीपर विविध कार्यक्रमास जसे की, प्रभातफेरीस प्रत्येक महाविदयालयाने उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

तरी आपण आपल्या अधिपत्याखालील जळगाव जिल्हयातील महाविदयालयीन युवक-युवतींना, शिक्षक व कर्मचारी वृंदासह जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आवारात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहणेबाबत आपण आदेशित करावे. जेणेकरुन एचआयव्ही/एड्स बाबतची माहिती जास्तीत जास्त युवा वर्गापर्यत पोहचवता येईल. या निमित्ताने हा राष्ट्रीय कार्यक्रम यशस्वी करण्यास आपले मोलाचे सहकार्य लाभेल.


कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
20 NOV 2019


(डॉ.श्री.नागोराव चव्हाण)
जिल्हा शल्य चिकित्सक, जळगाव

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

१. मा. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई
२. समन्वयक, एनएसएस विभाग, उत्तर महाराष्ट्र विदयापीठ, जळगाव